अधिसूचना

क्र. : ७६/२०२० **दि. १५/१०/२०२०**

विषय - सत्र २०२०-२१ मध्ये संलग्नित महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडुन प्रवेशासाठी प्रवेश शुल्क, ई. आकारण्याबाबत..

वाचा - (१) विद्यापीठ अधिसूचना क्र. ५०/२०१५
(२) विद्यापीठ अधिसूचना क्र. ४२/२०२०, दि. २८.०५.२०२०

ज्याअर्थी सत्र २०२०-२१ मध्ये संलग्नित महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडुन प्रवेश देण्यासाठी प्रवेश शुल्क ई. विद्यापीठाने अधिसूचना ५०/२०१५ नुसार आकारण्यात यावे असे अधिसूचित केलेले आहे व सदर शुल्क कोविड-२०१९ च्या महामारीमुळे अधिसूचना क्र. ४२/२०२० प्रमाणे घेण्यात यावे असे अधिसूचित केले आहे.

आणि

ज्याअर्थी कोविड-१९ च्या महामारीच्या पार्श्वभुमीवर मा. कुलगुरुंनी यावर विचार करण्यासाठी समिती नियुक्त केली होती, व सदर समितीच्या शिफारशी मा. कुलगुरुंनी कोवीड-२०१९ च्या महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या व त्यांचे पालकांची आर्थीक परिस्थितीचा विचार करुन विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत मान्य केली असून, सर्व संबंधितांना असे अधिसूचित करण्यात येते की, सत्र २०२०-२१ शैक्षणिक सत्रासाठी जे विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेश घेतील त्यांना अधिसुचना क्र. ४२/२०२० च्या अनुषंगाने खालील प्रमाणे सवलती देण्यात यावी.

१) विद्यापीठाने दिलेल्या अधिसुचना क्र. ५०/२०१५ व ४२/२०२० मध्ये दिलेल्या शुल्का व्यतिरीक्त महाविद्यालयाने ईतर कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये.

२) शिष्यवृत्ती किंवा इतर सवलती धारक विद्यार्थ्यांकडुन समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे शासन परिपत्रक क्र. सकसं/शिक्षण/शै.सं./भासशि/शिफी/पफी/०४-०५/१००५/का, दिनांक २४ जुन, २००४ नुसार शुल्क घेण्यात येऊ नये.

३) ज्या विद्यार्थांना शिष्यवृत्ती किंवा शुल्कात सवलत मिळत नाही अशा विद्यार्थ्यांकडुन अधिसुचना क्र. ५०/२०१५ च्या

(i) Appendix A (Part B) मध्ये दर्शविलेली University fee घेण्यात येऊ नये.

(ii) Appendix A (Part A) मध्ये "Tuition fee" वगळून, इतर शुल्कात ३० % टक्के सूट देवून उर्वरित फक्त ७० % शुल्क आकारण्यात यावे.

(iii) Tuition fee आणि उर्वरित ७० टक्के शुल्क किमान चार टप्प्यामध्ये भरण्याची विद्यार्थ्यांना मुभा देण्यात यावी.

-- सदर सवलत कोविड - १९ महामारीच्या पार्श्वभुमीवर देण्यात येत असुन सत्र २०२०-२१ करीता लागू राहील.

स्वा/-
(डॉ. तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ